# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/078/2021-2023

YEAR : 48) 15th March 2023 ( No. of Pages 08 ) ( No : 04


*जुलै २००९ पूर्वी एम.फील पदवी प्राप्त करणाऱ्या शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ प्राप्त होणे : ३*

# एम.फील. बाबत कोणत्या मुद्यांवर निर्णय घ्यायचा ? व त्याची प्रभाव तिथी कोणती असेल ? हे उच्च शिक्षण विभागाला अजूनही कळलेले नाही


**- प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*


**५१.** "**जुलै २००९ पूर्वी एम.फील पदवी प्राप्त करणाऱ्या शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ प्राप्त होणे**" या विषयावरील परिच्छेद १ ते ३३ असे ३३ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण सन २०२१ च्या नुटा बुलेटीनच्या तिसऱ्या अंकामध्ये प्रसुत करण्यात आलेले आहे. जुलै २००९ पूर्वी एम.फील. पदवी प्राप्त करणाऱ्या शेकडो शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ प्रत्यक्षात लागू करण्यात आलेले आहेत. तत्सम लाभ तत्समांना लागू करावे म्हणून १७ शिक्षकांनी 'बुक्टु'च्या मार्गदर्शनात मा.मुंबई खंडपीठासमोर याचिका दाखल केली. ही विसंगती लक्षात आल्यानंतर तत्सम शिक्षकांना तत्सम लाभ लागू करण्याच्या मार्गाचा स्वीकार उच्च शिक्षण विभागाने केला नाही. किमान त्या १७ शिक्षकांना ते लाभ लागू करण्याच्या मार्गाचा सुद्धा स्वीकार करण्यास उच्च शिक्षण विभागाने नकार दिला व त्याऐवजी शेकडो लाभान्वित शिक्षकांचे लाभ काढून घेण्यात यावे असा अत्यंत बेकायदेशीर हुकूम **दिनांक २७ जानेवारी २०२१** च्या परिपत्रकान्वये *(38/2021)* निर्गमित केला. उच्च शिक्षण विभागाची ही कृती उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांचा अवमान करणारी आहे, ही गोष्ट या टिपणातून नमूद करण्यात आली होती.

**५२.** "**जुलै २००९ पूर्वी एम.फील पदवी प्राप्त करणाऱ्या शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ प्राप्त होणे**" याच मथळ्याखाली परिच्छेद ३४ ते ५० समाविष्ट असलेले दुसरे एक तपशीलवार टिपण सन २०२१ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ५७ वर प्रसुत करण्यात आले होते. **दिनांक ३ मार्च २०२१ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने** एक परिपत्रक *(58/2021)* काढून उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करून आपला जुनाच हेका सुरू ठेवला होता. उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी एम.फील. ही अर्हता केवळ "**दिनांक १४.०६.२००६ रोजी किंवा त्यानंतर पण दिनांक २१ जुलै २००९ पूर्वी नियुक्त होणाऱ्या उमेदवाराला लागू आहे**" असा संकुचित व बेकायदेशीर अर्थ कवटाळून धरलेला होता. या उलट मा. उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी "**जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. ही पदवी प्राप्त केलेली आहे अशा सर्वांना नेट-सेट पात्रतेपासून मुक्तता राहील**" असा अर्थ कायद्याचा अंतिम शब्द म्हणून निश्चित करून दिलेला होता. त्यावर मा.सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब झाले. या दिनांक ३ मार्च २०२१ च्या शासननिर्णयातील बेकायदेशीरपणा या दुसऱ्या टिपणाने लक्षात आणून दिला होता.

**५३.** पूर्वी करून ठेवलेल्या अनेक चुका दुरुस्त करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक **१६ नोव्हेंबर २०२२** रोजी एक शासन परिपत्रक *(298/2022)* निर्गमित केले. त्यात सुद्धा अनेक चुका करून ठेवल्या. त्यातील एक चूक दुरुस्त करण्यासाठी आता दिनांक **१६ फेब्रुवारी २०२३** रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आणखी एक परिपत्रक *(30/2023)* निर्गमित केले आहे. दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ व १६ फेब्रुवारी २०२३ च्या शासननिर्णयातील बेकायदेशीर बाबी लक्षात आणून देणे यासाठी हे तिसरे टिपण तयार करण्यात आले आहे. मुख्यत्वे शासनाच्या या दोन ताज्या परिपत्रकांनी मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची कशी अवहेलना केलेली आहे, हे लक्षात आणून देणे हे या टिपणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**५४.** प्रथम दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या परिपत्रकाचा विचार करू. हे परिपत्रक अनेक दोषांनी भरलेले आहे ते पुढीलप्रमाणे :-

**(i)** "दि. १४.०६.२००६ पूर्वी नियुक्त एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करणेबाबत." असा या परिपत्रकाचा विषय आहे. तो अत्यंत चुकीचा असून "मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक १ जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. अर्हता धारण केलेली आहे त्या अध्यापकांना नेमणुकीच्या दिनांकापासून कॅसचे लाभ लागू करण्याबाबत" असा तो विषय असायला हवा होता.

**(ii)** दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या परिपत्रकाच्या पहिल्याच परिच्छेदातील पहिलेच वाक्य "**विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १९.०९.१९९१ च्या अधिसूचनेन्वये अकृषि विद्यापीठे व वरिष्ठ महाविद्यालयात अध्यापक म्हणून नियुक्त होण्यासाठी नेट परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य केलेले आहे.**" मुळात १९.०९.१९९१ पासूनच नेट-सेट सक्तीचे आहे अशी भूमिका उच्च शिक्षण विभागाने घेतली होती. त्या तरतुदी दिनांक १९.०९.१९९१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही, असे २७ जून २०१३ च्या शासन निर्णयात नमूद केलेले आहे. इथे उच्च शिक्षण विभागात थोडा उजेड पडला, पण थोडाच. दिल्लीच्या बहादुरशहा जफर मार्गावर १९.९.९१ ला विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यालयातून अधिसूचना निघाली की आकाशवाणी झाल्याप्रमाणे ती साऱ्या महाराष्ट्रभर त्याच दिवशी लागू होत नव्हती ही गोष्ट उच्च शिक्षण विभागातील काही लोकांना २० वर्षानंतर का होईना पण कळली हे त्या २७ जून २०१३ च्या शासननिर्णयातून दिसून येते. असे असतांना १६ नोव्हेंबर २०२२ च्या शासननिर्णयातील पहिल्याच परिच्छेदातील

## Nagpur University Teachers' Association

**MEETING NOTICE : 1**

**DATED : 15.03.2023**

**From :**
**Dr.Nitin C. Kongre**
Secretary, NUTA
Plot No. 144, Gayatri Nagar,
Behind IT Park, Nagpur-440022

**To,**
All the members
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that the General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.Nitin C. Kongre,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting***
***12.00 Noon on Sunday, the 7th May, 2023***

पहिलेच वाक्य निरर्थक ठरते. आता ते वाक्य टाकलेच तर त्या पहिल्या वाक्यानंतर "मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक १ जुलै २००९ पूर्वी एम.फील. अर्हता धारण केलेल्या शिक्षकांना नेट-सेटची अट लागू असणार नाही व त्यांना नेमणुकीच्या दिनांकापासून कॅसचे लाभ लागू करावे लागतील" हा भाग त्या पहिल्या वाक्याच्या शेवटी जोडणे आवश्यक होते.

**(iii)** नेट-सेटबाबतची "सदर तरतूद शासननिर्णय दि. २३.१०.१९९२ अन्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयांना लागू केली." हे या शासन परिपत्रकाच्या पहिल्या परिच्छेदातील दुसरे वाक्य आहे. **त्यापुढच्या ३५ दिवसात २३.१०.१९९२ च्या त्या शासननिर्णयाचे दुःखद निधन झाले होते ही गोष्ट मंत्रालयात कोणालाच ठाऊक नसावी ही सुद्धा मुळातच अति दुःखद घटना म्हणावी लागेल.** पुढच्या ३५ दिवसाच्या आत दिनांक २७ नोव्हेंबर १९९२ च्या दुसऱ्या शासन निर्णयाने (Resolution No. NGC 1792/(2224)/ UNI-4, Dated : 27th November, 1992.) २३ ऑक्टोबर १९९२ च्या पहिल्या शासननिर्णयाचे 'तेरावे' घातले. कारण दुसऱ्या शासननिर्णयाच्या दुसऱ्याच परिच्छेदात पहिला शासन निर्णय निष्प्रभावित (Supersede) करण्याचा उल्लेख असून तो शासननिर्णय मागे घेण्यात आल्याचे (Withdraw) दुसऱ्या शासन निर्णयाच्या तिसऱ्या परिच्छेदात नमूद आहे. २३.१०.१९९२ चा शासननिर्णय २७ नोव्हेंबर १९९२ रोजी दुसरा शासननिर्णय काढून आपण निष्प्रभावित केला, मागे घेतला, हे ३० वर्षानंतरसुद्धा उच्च शिक्षण विभागात कोणालाच ठावूक असू नये याबद्दल या विभागाची करावी तेवढी प्रशंसा थोडीच आहे.

**(iv)** या शासन परिपत्रकाच्या पहिल्या परिच्छेदाच्या शेवटी पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे. :- "**मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल झालेल्या असून सद्यःस्थिती प्रकरण सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.**" हे वाक्य पूर्णपणे लबाडीचे आहे. एम.फील. अर्हताधारकांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या स्तरावर हे प्रकरण अंतिमतः निकाली निघाले आहे. खरे म्हणजे पुन्हा पुन्हा अशी प्रकरणे सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवू नका अशा प्रकारचे पत्रक काढण्याचे आदेश त्या न्यायालयाने मुख्य सचिवांना दिले होते *(43/2021)* व मुख्य सचिवांनी त्याप्रमाणे आदेश *(44/2021)* काढले होते. ही गोष्ट लपवून ठेवण्यात आलेली आहे.

**(v)** दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ च्या या शासन परिपत्रकाच्या परिच्छेद २ मध्ये देण्यात आलेली माहिती हीसुद्धा अर्धवट असून उच्च व सर्वोच्च न्यायालयातील घटनाक्रम हा २०२२ च्या नोव्हेंबरपर्यंत सुद्धा उच्च शिक्षण विभागातील कोणत्याही अधिकाऱ्याला ठावूक नव्हता असे स्पष्ट करणारी आहे.

**(vi)** दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ च्या शासन परिपत्रकातील परिच्छेद तीन पूर्णपणे मागे घेऊन उच्च शिक्षण विभागाला दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजीचे परिपत्रक काढून तिसरा परिच्छेद नव्याने टाकावा लागला. यावरूनच मुळातल्या तिसऱ्या परिच्छेदाची लायकी लक्षात येते. त्यामुळे त्याबाबतीत काही नमूद न केलेले बरे.

**(vii)** या परिपत्रकातील चौथा परिच्छेदसुद्धा संपूर्णपणे उच्च न्यायालयाच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविषयी अज्ञान व्यक्त करणारा आहे, एवढे नमूद करणे पुरेसे आहे.

**५५.** दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या परिपत्रकातील चूक दुरुस्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजी एक नवे शासन परिपत्रक *(30/2023)* निर्गमित केले असून या परिपत्रकाचा विषय "**दि. १४.०६.२००६ पूर्वी नियुक्त एम.फील. अर्हता धारक अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करणेबाबत**" असा असून आपल्या दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या शासन परिपत्रकातील परिच्छेद ३ वगळून टाकावा व त्या जागी नवीन परिच्छेद ३ दाखल करावा असे या परिपत्रकात नमूद आहे. या सुधारित परिच्छेद ३ चे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येते की, दिनांक १४.०६.२००६ पूर्वीच्या एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना काय सुविधा लागू होतील याची माहिती देण्यात आली असून या सुधारित परिच्छेद ३ मध्ये असेही नमूद करण्यात आलेले आहे की, "**ज्यांनी सेवेत असतांना एम.फील. अर्हता धारण केली असेल त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस पदोन्नतीचे लाभ देय राहतील.**" दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या परिपत्रकात सुधारणा करून त्यातील तिसरा परिच्छेद दुरुस्त करण्यासाठी काढलेल्या **या परिपत्रकामध्ये सुद्धा एम.फील. अर्हता धारकांच्या बाबतीत कोणत्या मुद्यांवर निर्णय घ्यावयाचा आहे व त्याबाबतची प्रभाव तिथी कोणती आहे या दोनही बाबी उच्च शिक्षण विभागाला अजूनही कळलेल्या नाहीत असे स्पष्टपणे दिसून येते.**

**५६.** मा.उच्च न्यायालयाचे अनेक निर्णय *(61/2021)* व याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेली कायद्याची अंतिम स्थिती याबाबतचे संपूर्ण अज्ञान दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या या परिपत्रकातून विपुलपणे पाझरतांना दिसून येते. **ज्यांनी सेवेत असतांना एम.फील. अर्हता धारण केली असेल त्यांना**

## महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,मंत्रालय, मुंबई-४०००३२

ई-मेल : vishi1-hted@mah.gov.in, popat.galgate@gov.in दूरध्वनी क्र. ०२२२२७९३१७४

### क्रमांक : संकीर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ : दिनांक : १६.०२.२०२३

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय : दि. १४.०६.२००६ पूर्वी नियुक्त एम.फील. अर्हता धारक अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करणेबाबत.**

**संदर्भ :** (१) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र. F-९-१२/२०२०/(PS/MISC) दिनांक ०५.०९.२०२२.

(२) शासन पत्र समक्रमांक दि. १६.११.२०२२

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या लाभासंदर्भात निर्गमित केलेल्या स्पष्टीकरणात्मक खुलाशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहेत. सदर पत्रातील परिच्छेद क्र. ३ मध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे. :-

"विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ०५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दि. १४.०६.२००६ पूर्वी एम.फील. अर्हतेवर विहित निवड समितीच्या माध्यमातून नियुक्ती तसेच सेवेत सदर अर्हताधारक, ज्यांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे व ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट मधून सूट दिलेली आहे, असे अध्यापक एम.फील. अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी पात्र आहेत, असे कळविलेले आहे. त्यानुसार असे स्पष्ट करण्यात येते की, दि. १४.०६.२००६ पूर्वी ज्या अध्यापकांची नियुक्ती एम.फील. अर्हतेवर विहित निवड समितीच्या माध्यमातून झाली आहे व ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट परीक्षेमधून सुट देऊन तसे अध्यापकांच्या नावासहित विद्यापीठांना कळविलेले आहे व त्यानुसार विद्यापीठाने नियमित स्वरूपात मान्यता दिलेली आहे, अशा एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील."

तथापि, उपरोक्तप्रमाणे नमूद तरतुदीनुसार प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना संदिग्धता निर्माण होऊन अडचणी येत असल्याचे सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी दि. ३१.०१.२०२३ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये नमूद केले आहे. **त्यामुळे उपरोक्त दि. १६.११.२०२२ च्या पत्रातील परिच्छेद क्र. ३ पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.**

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ०५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विहित निवड समितीच्या माध्यमातून दि. १४.०६.२००६ पूर्वी नियुक्त झालेल्या व ज्यांनी सेवेत असताना, दि. ०१.०१.१९९४ ते दि. ११.०७.२००९ या कालावधीत एम.फील. ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे, तसेच ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील. अर्हतेच्या आधारे नेट मधून सूट दिलेली आहे व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे, असे अध्यापक एम.फील. अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी पात्र आहेत, असे कळविलेले आहे. त्यानुषंगाने असे स्पष्ट करण्यात येत की, दि. १४.०६.२००६ पूर्वी ज्या अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, तसेच ज्या अध्यापकांनी दि. १४.०६.२००६ पूर्वी नियुक्तीवेळी एम.फील. अर्हता धारण केली होती, अशा अध्यापकांची नियुक्ती जर विहित निवड समितीच्या माध्यमातून झाली असेल, तसेच अशा अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील. अर्हतेच्या आधारे नेट परीक्षेमधून सूट देऊन त्यांच्या नावासहित तसे संबंधित विद्यापीठांना कळविलेले असेल व विद्यापीठाने नियमित स्वरूपात मान्यता दिलेली असेल, **तर (१) ज्या अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना नियुक्तीपासून व (२) ज्यांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील."**

उपरोक्त बाबींची पूर्तता होत आहे, याची खातरजमा करून कार्यवाही करण्यात यावी.

(अजित बाविस्कर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :** उचित कार्यवाहीसाठी, (१) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण (२) निवडनस्ती (विशि-१)

**सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस पदोन्नतीचे लाभ देय राहतील** असा शहाजोगपणाचा खुलासा या परिपत्रकामध्ये करण्यात आलेला आहे. वस्तुतः मा.सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेली कायद्याची अंतिम स्थिती लक्षात घेता **दिनांक १ जुलै २००९ पूर्वी एम.फील. अर्हता धारण करणाऱ्या प्रत्येक शिक्षकाला नेमणुकीच्या दिनांकापासून कॅस पदोन्नतीचे लाभ लागू केल्या जातील हा यातील खरा मुद्दा आहे. पण हा मुद्दा लक्षात न घेता अर्हता धारण केल्याच्या तारखेपासून हे लाभ लागू होतील अशा प्रकारचे स्थानिक उत्पादन (Local Production) उच्च शिक्षण विभागाने निर्मित केलेले आहे.**

**५७. एम.फील. ही अर्हता ज्यांनी दिनांक १ जुलै २००९ पूर्वी प्राप्त केलेली आहे त्यांना कोणत्या तारखेपासून 'कॅस'चे लाभ द्यावेत हा मुद्दा नसून त्यांना नेमणुकीच्या दिनांकापासून हे लाभ द्यावे लागतील ही कायद्याची सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेली अंतिम स्थिती आहे.** हे लक्षात न घेता एम.फील. अर्हताधारक अध्यापकांच्या बाबतीत कोणत्या मुद्यांवर निर्णय घ्यावयाचा याबाबतचा घोळ तर उच्च शिक्षण विभागाने घातलेलाच आहे पण त्याचबरोबर निर्णयाची प्रभाव तिथी कोणती हेसुद्धा उच्च शिक्षण विभागाला कळलेले नाही. वस्तुतः सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेल्या कायद्याच्या अंतिम स्थितीचा विचार केला तर दिनांक १ जुलै २००९ पूर्वी नियुक्त झालेल्या एम.फील. अर्हता धारण करणाऱ्या कोणत्याही शिक्षकाला नेट-सेटची पात्रता लागू असणार नाही अशी ही स्थिती असतांना उच्च शिक्षण विभाग मात्र १४ जून २००६ ही तारीख पुन्हा पुन्हा घट्ट पकडून ठेवत आहे असे स्पष्टपणे दिसून येते आणि त्यामुळे याबाबतची स्थिती तपशीलवारपणे पहिल्या व दुसऱ्या टिपणात नमूद केलेली आहे. ती पुन्हा एकदा या नव्या परिपत्रकामुळे थोडक्यात नमूद करणे आवश्यक झालेले आहे.

**५८.** दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजीचे उच्च शिक्षण विभागाचे परिपत्रक पाहिल्यानंतर अनेक शिक्षकांनी संघटनेकडे त्याबाबतीत चौकशी केली त्यावेळी संघटनेतर्फे यापूर्वी परिच्छेद १ ते ५० मध्ये या विकृतीला कसे तोंड द्यायचे? याबाबतचे तपशील नमूद करण्यात आलेले आहे असे सांगण्यात आले. मात्र आता तीच चूक पुन्हा करणारे दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजीचे परिपत्रक आल्यानंतर पुन्हा अनेक शिक्षकांनी याबाबतीत चौकशी केली. तेव्हा त्याबाबतचा खुलासा करण्यासाठी म्हणून या परिच्छेदांचे लेखन केलेले आहे. या दोनही परिपत्रकांमध्ये त्याच त्याच चुका पुन्हा पुन्हा करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्याबाबतच्या उपाययोजनांचे स्वरूपसुद्धा तेच तेच आहे हे नमूद करण्यात येत आहे. परिच्छेद १ ते ५० मध्ये केलेली निरीक्षणे व उपाययोजनांचे स्वरूप हे तेच तेच असणार त्यामध्ये कोणताही बदल झालेला नाही.

**५९.** मा.उच्च न्यायालयाने याबाबतीत अनेक निर्णय दिले असून त्यापैकी उच्च न्यायालयाच्या खंडपीठांनी दिलेले नऊ निर्णय हे संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. या सर्व निर्णयांमध्ये "**जुलै २००९ पूर्वी एम.फील. ही अर्हता धारण करणाऱ्या अध्यापकाला नेट-सेटची पात्रता लागू होत नाही व त्यामुळे त्यांना 'कॅस'चे लाभ हे नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून लागू होतील**" असे स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. या नऊ पैकी एका प्रकरणात शासन सर्वोच्च न्यायालयात गेले असता सर्वोच्च न्यायालयाने शासनाची विशेष अनुमती याचिका (SLP) फेटाळून लावली. मा.उच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठांचे हे नऊ निर्णय व मा.सर्वोच्च न्यायालयाचा एक निर्णय याचे तपशील सन २०२१ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ६१ वर यापूर्वी प्रसृत करण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्याबाबतीत आणखी वेगळा काही खुलासा करण्याची आवश्यकता आहे असे अजिबात वाटत नाही.

**६०.** सारांश रुपाने सांगावयाचे झाल्यास, **मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत निश्चित करून दिलेली कायद्याची अंतिम स्थिती मान्य करण्यास उच्च शिक्षण विभाग सतत नकार देत आहे, ही उच्च शिक्षण विभागाची मुख्य चूक होय.** म्हणूनच त्या सर्व निर्णयांचा पुन्हा आढावा घेणे आवश्यक आहे असे वाटत नाही. **तथापि, मा.उच्च न्यायालयात निकाली निघालेले जे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले त्या प्रकरणाचे तपशील थोडक्यात नमूद करण्यात येत आहे.** मुंबई उच्च न्यायालयाच्या मा.नागपूर खंडपीठासमोर W.P. No. 1213 of 2009 या प्रकरणात दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजी मा.खंडपीठाने हा निर्णय दिलेला आहे. या याचिकेतील याचिकाकर्त्याची नेमणूक ही दिनांक २१ एप्रिल २००३ रोजी झालेली होती व याचिकाकर्त्यांनी एम.फील. ही अर्हता मार्च २००९ मध्ये प्राप्त केलेली होती असा स्पष्ट उल्लेख या निर्णयामध्ये नमूद आहे. अनेक खंडपीठांनी तसे निर्णय दिलेले असल्यामुळे "**दिनांक १ जुलै २००९ पूर्वी एम.फील. ही अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट-सेट पासून मुक्तता देण्यात आलेली आहे हा आता वाद विषय राहिलेला नाही.**" ही वस्तुस्थिती शासनाच्या अधिवक्त्यांनी मान्य केल्याचा स्पष्ट उल्लेख "The learned Additional Government Pleader did not dispute this position." या शब्दात या निर्णयात केलेला आहे. शेवटी मा.उच्च न्यायालयाने याबाबतीत याचिकार्त्यांच्या बाजूने निर्णय दिला व नेमणुकीच्या दिवसापासून त्यांच्या सेवेला मान्यता देण्यात यावी व शिक्षक या नात्याने उपलब्ध होणारे सर्व अनुषंगिक लाभ त्यांना उपलब्ध करून द्यावेत असेही मा.उच्च न्यायालयाच्या या आदेशामध्ये नमूद आहे.

**६१.** उच्च न्यायालयामध्ये दिनांक २४ फेबुवारी २०१७ रोजी W.P. No. 1213 of 2009 या प्रकरणात दिलेल्या निर्णयाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करावी अशा प्रकारची लेखी सूचना सरकारी वकिलांना उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी केली असता दिल्लीस्थित सरकारी वकिलांनी उच्च शिक्षण विभागाला स्पष्टपणे असे कळविले की, "**मा.उच्च न्यायालयासमोर सरकारी वकील जेव्हा एखाद्या निर्णयाशी सहमत होतात तेव्हा त्यावर अपील करण्याची स्थिती हातून निघून गेलेली असते ही कायद्याची सर्वमान्य स्थिती आहे.**" दिनांक २० नोव्हेंबर २०१७ रोजी दिल्लीस्थित सरकारी वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्याविषयीच्या आपल्या सूचना मागे घेण्यात याव्यात अशी विनंती उच्च शिक्षण सचिवांना केली. पण विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचा हट्ट उच्च शिक्षण विभागाने कायम ठेवला असे दिसून येते. मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये करण्यात आलेली ही विशेष अनुमती याचिका दिनांक ११ जुलै २०१८ रोजी सुनावणीला आली. त्या दिवशीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजाचा शब्दशः वृत्तांत सन २०२१ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ४३ वर प्रसृत करण्यात आलेला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने ही विशेष अनुमती याचिका फेटाळून लावली. (dismissed) इतकेच नव्हे तर अनावश्यक अशा याचिका (unnecessary litigation) सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात येऊ नयेत. राज्याच्या मुख्य सचिवांनी याबाबत काळजी घ्यावी असेही मा.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले. इतकेच नव्हे तर मुख्य सचिवांनी केलेल्या कारवाईचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात दोन महिन्यात दाखल करावा असेही मा.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले.

**६२.** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानंतर दिनांक ४ सप्टेंबर २०१८ रोजी महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांनी एक परिपत्रक निर्गमित केले व त्यामध्ये याबाबतचे आदेश (*44/2021*) पारित केले. एवढे सारे महाभारत घडल्यावरसुद्धा सन २०२३ च्या फेब्रुवारी महिन्यात उच्च शिक्षण विभागातील अधिकारी "**केव्हा एम.फील. अर्हता प्राप्त केलेल्या अध्यापकाला केंव्हापासून 'कॅस'चे लाभ द्यावे?**" या भूमिकेला कुरवाळत बसले आहेत.

**६३.** उच्च शिक्षण विभागाने '**लाभ काढून घेण्याबाबत**' काढलेल्या २७ जानेवारी २०२१ रोजीच्या परिपत्रकाची (*38/2021*) महाराष्ट्रात एकाही ठिकाणी अंमलबजावणी झाली नाही. दिनांक ३ मार्च २०२१ रोजी पुन्हा त्याच बाबतीत काढलेल्या परिपत्रकाची (*40/2021*) एकाही ठिकाणी अंमलबजावणी झाली नाही. पुन्हा दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी उच्च शिक्षण विभागाने आणखी एक परिपत्रक (*298/2022*) काढले व "**अशा अपात्र अध्यापकांनाही कॅसचे लाभ देण्यात आले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असल्याने त्याबाबत कार्यवाही करण्याबाबत शासन पत्र दि. २१.०१.२०२२ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तात्काळ शासनास सादर करावा.**" असे आदेशित केले. त्याचीही महाराष्ट्रात एकाही ठिकाणी अंमलबजावणी झाली नाही. दोन-दोन वर्षे आपल्या तीन-तीन आदेशांची एकाही ठिकाणी अंमलबजावणी होत नाही, एवढी आपली दयनीय अवस्था का झाली? याचा विचार करायला उच्च शिक्षण विभागात कोणालाही वेळ नाही. तसेच मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेल्या कायद्याच्या अंतिम स्थितीची अवहेलना करणाऱ्या आपल्या आदेशाची अवहेलनाच होणार, हे उच्च शिक्षण विभागाला सांगायला कोणीही तयार नाही.

**६४.** नाही म्हणायला सर्व विभागाच्या शिक्षण सहसंचालकांनी ही बाब आपल्या वरिष्ठांच्या लक्षात आणून दिली त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. "मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेल्या कायद्याच्या अंतिम स्थितीची आपण इज्जत केली नाही तर आपल्या परिपत्रकाची बेइज्जतच होणार" अशा कठोर शब्दात ही बाब सहसंचालक आपल्या वरिष्ठांच्या लक्षात आणून देऊ शकत नाहीत, हे आपणही लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी काय लक्षात आणून दिले व कसे लक्षात आणून दिले? ते १६ फेब्रुवारी २०२३ च्या शासननिर्णयातच नमूद आहे. शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"तथापि, उपरोक्तप्रमाणे नमूद तरतुदीनुसार प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना संदिग्धता निर्माण होऊन अडचणी येत असल्याचे सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी दि. ३१.०१.२०२३ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये नमूद केले आहे. **त्यामुळे उपरोक्त दि. १६.११.२०२२ च्या पत्रातील परिच्छेद क्र. ३ पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.**"

एवढ्या सौम्य शब्दात लक्षात आणून दिलेली चूक चटकन दुरुस्त केली तर उच्च शिक्षण विभागाचे नावच बदलून टाकावे लागेल.

**६५.** दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ च्या परिपत्रकातील परिच्छेद ३ काढून टाकून त्या जागी टाकलेल्या नव्या परिच्छेद ३ मध्ये पुन्हा त्याच चुका केलेल्या आहेत. शिवाय मुळातला परिच्छेद ४ अजून कायमच आहे. दिनांक २७ जानेवारी २०२१ चे परिपत्रक कायमच आहे. अशा परिस्थितीत लाभान्वित व लाभवंचित शिक्षकांनी काय उपाययोजना कराव्यात याबाबत तपशीलवार मार्गदर्शन करणारा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा निर्णय (*46/2021*) यापूर्वीच प्रसृत करण्यात आलेला आहे. लाभधारकांचे लाभ काढून घेण्याचा प्रयत्न झाल्यास द्यावयाच्या Legal Notice चा नमूना (*48/2021*) यापूर्वीच प्रसृत करण्यात आलेला आहे. करावयाच्या उपाययोजनांचे तपशील परिच्छेद २९ ते ३२ वर (*50/2021*) नमूद केलेले आहे. त्याची पुनरुक्ती करण्याची आवश्यकता नाही.

*PR : (1) 37/2021 (2) 57/2021 (3) 29/2023*

# श्री.प्रवीण बर्दापूरकर यांची 'फेसबुक पोस्ट'

**- डॉ. प्रवीण रघुवंशी**, अध्यक्ष, नुटा

**१.** अमरावती विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुंनी सिनेटची निवडणुकीसाठीची विशेष सभा तहकूब करण्यासाठी मा. राज्यपालांची परवानगी मागितली. त्या कारणावरून दिनांक ४ ते १५ फेब्रुवारी २०२३ दरम्यान दोन-तीन वेळा उच्च न्यायालयाच्या कामकाजाच्या निमित्ताने नागपूरला जाणे झाले. नागपूरच्या एका भेटीत संघटनेतील एका ज्येष्ठ सहकाऱ्यानी दिनांक ७ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रसृत केलेली श्री.प्रवीण बर्दापूरकर यांची एक 'फेसबुक पोस्ट' माझ्या लक्षात आणून दिली. श्री.प्रवीण बर्दापूरकर हे गेली ४०-४५ वर्षे पत्रकारितेत काम केलेले एक ज्येष्ठ पत्रकार आहेत. दैनिक 'लोकसत्ता'च्या नागपूर आवृत्तीचे संपादक म्हणून नागपूर येथे तसेच दैनिक 'लोकमत'च्या राजकीय वार्तांकनाचे संपादक म्हणून नवी दिल्ली येथे त्यांनी अनेक वर्षे काम केले आहे. त्यांनी लिहिलेल्या या पोस्टचा मथळा **"खरंच सांगतो, 'बी.टीं.' सारखे लोकप्रतिनिधी बहुसंख्य होते !"** असा आहे. त्यांनी लिहिलेली ही पोस्ट वाचल्यानंतर संघटनेमध्ये बी.टी. सरांनी व त्यांच्या तत्कालीन सहकाऱ्यांनी लावून दिलेल्या साधेपणाच्या अनेक सवयी अनेक वर्षांपासून संघटनेत आजही अंमलात असल्याची बाब चटकन मनाला चाटून गेली.

**२.** 'नुटा'च्या कार्यकारी मंडळाची ज्या ज्या वेळेला बैठक असेल त्या त्या वेळेला त्या बैठकीच्या दिवशीचा कार्यकारी मंडळाच्या सदस्यांचा जेवणाचा खर्च हा नियमानुसार संघटनेतून करता आला असता पण तो तसा न करता चक्रानुक्रमानुसार कार्यकारी मंडळाच्या दोन सदस्यांनी तो खर्च करावा अशा प्रकारची एक व्यवस्था 'नुटा' संघटनेमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. कार्यकारी मंडळाच्या सभेची जी सूचना रवाना होते त्या सूचनेमध्ये पुढीलप्रमाणे टीप टाकलेली असते. :-

**"LUNCH :** Meeting will start exactly at the scheduled time (i.e.11.00 a.m) at NUTA Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University,Campus Amravati- 444 602 and will be adjourned for lunch at 1.00 P.M. You are requested by Dr.A.M. Chandel & Prin. S.T. Sangle to attend the **lunch."**

गेले अनेक वर्षे ही प्रथा अशीच सुरू आहे. संघटनेचे ज्येष्ठ नेते प्रा.शंकरराव सांगळे यांनी इहलोकीचा प्रवास संपविण्यापूर्वीच्या एक-दोन दिवस अगोदर झालेल्या 'नुटा'च्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीच्या सूचनेतील उपरोक्त मजकूर वर जसाच्या तसा नमूद केलेला आहे. बैठक संपल्यावर हात जोडून सांगळे सर सर्वांना भोजनासाठी विनंती करताहेत हे चित्र आजही डोळ्यासमोर आले म्हणजे मन गलबलून जाते.

**३.** जी गोष्ट कार्यकारी मंडळाच्या बैठकीची तीच नुटाच्या आमसभेच्या बैठकीची. आमसभेच्या बैठकीची कामकाज पत्रिका निर्गमित होत असतांना गेली अनेक वर्षे त्या सूचनेसोबत पुढील सूचना सुद्धा न चुकता प्रकाशित केली जाते.

*"**नुटाच्या आमसभेच्या वेळी करावयाच्या व्यवस्थेसंबंधी सूचनाः** आमसभा ठरलेल्या वेळी म्हणजे बरोबर दुपारी १२.०० वाजता सुरु होत असते, हे लक्षात ठेऊनच एकूण व्यवस्था असावी. सभा सुरु होण्याच्या पूर्वीच्या एक तासात सर्व सदस्य आपापल्या सोबत आणलेल्या जेवणाच्या डब्यांचा एकमेकासोबत आस्वाद घेत असतांना त्यांच्या बसण्यासाठी बगीच्यात, झाडाखाली, सावलीत किंवा उन असल्यास खोल्यातून स्वच्छतायुक्त व्यवस्था व सोबत पिण्याच्या पाण्याची निट व्यवस्था ही आमसभेच्या आयोजकांनी करावी एवढीच याबाबत अपेक्षा असते. - **डॉ.नितीन कोंगरे, सचिव, नुटा"***

गेली अनेक वर्षे ही व्यवस्था सुरू आहे. ही व्यवस्था केंव्हा व का सुरू झाली याची माहिती घेतली असता असे समजले की, केव्हातरी एकदा आणीबाणीच्या काळामध्ये यवतमाळ येथे आमसभा झाली होती. यवतमाळच्या मंडळींनी आमसभेची खुपच जोरात तयारी केली होती. विशेषतः आमसभा सुरू होण्यापूर्वी सुग्रास भोजनाची जी व्यवस्था करण्यात आली त्यामुळे अनेक स्थानिक सभासद त्यात गुंतून पडले. शिवाय एका मागून एक उठणाऱ्या पंगतीमुळे आमसभा उशिरा सुरू झाली. त्यावेळेपासून अशा प्रकारची सूचना प्रकाशित करण्याची व्यवस्था सुरू झाली व ती आजपावेतो सुरू आहे. त्यामुळे आमसभा बरोबर वेळेवर सुरू होते. आमसभेचे कामकाज काही मिनिटाच्या उशिराने सुरू झाल्याचे आम्ही गेल्या ५-२५ वर्षात पाहिले नाही. प्रवासाबाबतसुद्धा कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी काही काटेकोर व्यवस्थांचे पालन केले पाहिजे अशा प्रकारची नियमावली संघटनेने स्वीकृत केली आहे. या साध्या साध्या सवयी लागण्याचे किंवा लावण्याचे श्रेय बी.टी. सरांना व कार्यकारी मंडळाच्या आमच्या तत्कालीन पिढीला आहे. त्या प्रथा आमच्या पिढीने सुरू ठेवलेल्या आहेत याबद्दल आम्हाला धन्यता वाटते.

**४.** कुठल्यातरी एका प्रवासात रेल्वे स्टेशनवर प्रा.बी.टी.देशमुख हे एका रेल्वेच्या पेटीवर निवांतपणे बसलेले आहेत. ही गोष्ट या 'फेसबुक पोस्ट'मध्ये श्री.प्रवीण बर्दापूरकर यांनी मांडलेली आहे. इतकेच नव्हे तर त्यांच्या संग्रही असलेले प्रा.बी.टी.देशमुख यांचे ते छायाचित्र सुद्धा त्यांनी या 'पोस्ट' सोबत प्रसृत केलेले आहे. त्यांच्या या 'पोस्ट'मधील पुढील मजकूर एक नवीन माहिती देणारा आहे. "एक आठवण ! बी.टी.देशमुख विधान परिषदेची निवडणूक हरले, तेव्हाची आहे. तेव्हा मी 'लोकसत्ता'च्या विदर्भ आवृत्तीचा संपादक होतो. निकाल आल्यावर आमचे तत्कालीन संपादक कुमार केतकरांना फोन केला. निकाल सांगतांना माझ्या स्वरातली निराशा आणि दुःख बहुधा तीव्र शब्दांत व्यक्त झालं आणि ते केतकरांनी ओळखलं. 'बी.टी. हरले' हे ऐकल्यावर त्यांनाही वाईट वाटलं. मग केतकर म्हणाले, "बी.टी. हरायला नको होते पण, घडलं ते घडलं. उद्याच्या 'व्यक्तीवेध'मध्ये निवडणूक हरलेल्या बी.टीं.वर तू लिही." त्याप्रमाणं दुसऱ्या दिवशी 'लोकसत्ता'त बी.टीं. वर 'व्यक्तीवेध' प्रकाशित झाला. **निवडणूक हरलेल्या पण, चारित्र्यवान आणि तळमळीच्या असलेल्या नेत्याची दखल घेतली जाण्याचा पत्रकारितेच्या माझ्या साडेचार दशकातला तो एक भरजरी ऐवज आहे."**

**५.** सन २०१० मध्ये विधानपरिषदेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर दिनांक २ डिसेंबर २०१० रोजीच्या लोकसत्तामध्ये 'व्यक्तिवेध' प्रसिद्ध झाला होता. शालेय जीवनापासून तर २०१० पर्यंतच्या प्रवासातील बी.टी. सरांच्या प्रवासाचे बिनचूक उल्लेख या 'व्यक्तिवेध' मध्ये होते. शिवाय नुटा आणि महाराष्ट्रातील महाविद्यालयीन शिक्षक चळवळीचे तसेच उल्लेख त्या 'व्यक्तिवेध'मध्ये होते. इतकी माहिती बिनचूकपणे 'व्यक्तिवेध'मध्ये समाविष्ट करणारे व्यक्तिवेधचे लेखक कोण आहेत? हे त्यावेळेला कळायला काही मार्ग नव्हता. संपादकीय धोरणाप्रमाणे लोकसत्तामध्ये 'व्यक्तिवेध' या सदरात जेव्हा काही मजकूर प्रसृत केला जातो, त्यावेळेला लेखकाचे नाव प्रकाशित करण्याची पद्धत, प्रथा म्हणून लोकसत्ताने त्यावेळी स्वीकारलेली नव्हती व आजही तेच धोरण सुरू आहे. पण आता प्रसृत झालेल्या या 'फेसबुक पोस्ट'मुळे तो व्यक्तिवेध लिहिणारे लेखक श्री.प्रवीण बर्दापूरकर होते, ही गोष्ट ठावूक झालेली आहे. श्री.प्रवीण बर्दापूरकर यांनी लिहिलेली ही 'फेसबुक पोस्ट' त्या छायाचित्रासह प्रसृत करण्यात येत आहे. त्यावेळेचे (२ डिसेंबर २०१०) लोकसत्तामधील 'व्यक्तिवेध' सुद्धा सोबत प्रसृत केलेले आहे. श्री.प्रवीण बर्दापूरकर यांनी लिहिलेल्या या 'फेसबुक पोस्ट' वर आलेल्या Comments (टिप्पणी) सुद्धा सोबत दिलेल्या आहेत.

*****

## *१४ मार्च पासून सुरू होणाऱ्या बेमुदत काम बंद आंदोलनाबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका*

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या दि. ८ मे २०२२ रोजी पार पडलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत विषय क्र. ६ नुसार जुन्या पेन्शन योजने संदर्भात निर्णय घेण्यात आलेला आहे. या विषयाच्या अनुषंगाने **केवळ जुनी पेन्शन योजना लागू करणे या एकाच मागणी करीता आंदोलन होत असेल तर त्यात सहभागी होण्याबाबत निर्णय झालेला आहे.** परंतु महाराष्ट्र राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचारी संघटनेने या मागणी सोबत ईतर १७ मागण्यांकरिता १४ मार्च २०२३ पासून बेमुदत काम बंद आंदोलनाचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. महाराष्ट्र राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचारी संघटनेच्या ईतर १७ मागण्या ह्या विद्यापीठ व महाविद्यालयीन प्राध्यापक यांच्याशी संबधीत नाहीत.

त्यामुळे एमफुक्टो सदर बेमुदत काम बंद आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी न होता आंदोलनास पाठिंबा देत आहे. एमफुक्टोच्या सर्व घटक संघटनानी आपआपल्या कार्य क्षेत्रात महाराष्ट्र राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचारी संघटनेच्या वतीने होणाऱ्या ईतर कृती कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे ठरविण्यात येत आहे.

**डॉ.एस.पी.लवांदे**, अध्यक्ष　　　　**डॉ.पी.बी.रघुवंशी**, सचिव

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION (MFUCTO)

# खरंच सांगतो , 'बी.टीं.' सारखे लोकप्रतिनिधी बहुसंख्य होते !

***!! नोंद : ५ !!***

Praveen Bardapurkar : 7 February at 13:51

कांही जुनी छायाचित्रे सापडली असल्याचा उल्लेख मध्यंतरी एका नोंदीत केला होता. त्यात एक छायाचित्र आहे ते प्रा.बी.टी.देशमुख यांचं. फारा वर्षांपूर्वी अमरावतीच्या कुणा पत्रकरांनं ते मला पाठवलं होतं. (विदर्भातील ज्येष्ठ सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यकर्ते गिरीश गांधी यांचा अमृत महोत्सवी सत्कार अमरावतीला माझ्या अध्यक्षतेखाली अलीकडेच झाला तेव्हा हा पत्रकार भेटला होता पण, सॉरी त्याचं नाव मी विसरलो...) बहुधा अमरावतीच्या बडनेरा रेल्वे स्टेशनवरचं आहे हे छायाचित्र. पुन्हा एकदा नमूद करतो, मी किस्से सांगत नाही. **किस्से सांगोवांगी असतात. ही तर अस्सल आठवण आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाची आयुधं नेण्यासाठी देण्यात येणाऱ्या पत्र्याच्या एका पेटीवर आमदार बी.टी. शांतपणे बसलेले असल्याचं छायाचित्रात दिसतं.**

आता आमदार-खासदार तर सोडाच नगर किंवा ग्राम पंचायतीवरही निवडून आलेला सदस्य देखील वर्षभरातच हातात सोन्याचं ब्रेसलेट, गळ्यात जाडशी सोन्याची साखळी, हातात महागडा फोन आणि भारी किंमतीचे ब्रँडेड कपडे घालून तो एक तर विमानानं किंवा त्याच्या भारी एसयुव्ही गाडीनं फिरतो पण, ते असो. **एक काळ असा होता की, एसटी महामंडळाच्या प्रत्येक बसमध्ये पहिल्या पांच जागा आमदार, खासदार, अधिस्वीकृतिधारक पत्रकार यांच्यासाठी राखीव असत. महत्वाचं म्हणजे या साध्या बसमधून प्रवास करतांना अनेक दिग्गज नेत्यांना मी लहानपणी पहिलं आहे;** पत्रकारितेत आल्यावर त्यापैकी कांहीच्या सोबत प्रवास करत गप्पाही मारल्या आहेत. बी.टी. ही त्यापैकी एक आहेत. शासकीय विश्रामगृहात राहिल्यावर तेथलं राहण्या-भोजनाचे बिल देणारेही अनेक लोकप्रतिनिधी अनुभवता आले आहेत .

**राज्याच्या विधिमंडळात बी.टी. १९८० साली आले आणि विधिमंडळ संकलनाला मी १९८१ साली सुरुवात केली. तेव्हा विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात आणि संसदेतही साधे, धवल चारित्र्याचे आणि धनलोभ नसणारे लोकप्रतिनिधी बहुसंख्य होते.** शिवाय जनतेचे प्रश्न ते सभागृहात मोठ्या तळमळीनं तर कधी आक्रमकपणे लावून धरत असत. बी.टीं. ना ही त्या रुपात मी बघितलं आहे . राजकीय मतभेद बाजूला ठेवत बी.टी.देशमुख आणि नितीन गडकरी यांनी विदर्भाच्या विकासाच्या अनुशेष आणि अनुशेषाच्याही अनुशेषाचा लढा किती जिद्दीनं एकत्रितपणे न्यायालय आणि विधीमंडळात कसा लढवला यांचाही एक पत्रकार म्हणून मी साक्षीदार आहे.

पत्रकारितेतील माझी पिढी भाग्यवानच खरी, बी.टीं. सारखे साधे आणि निर्मोही लोकप्रतिनिधी वैपुल्यानं पाहायला मिळाले. तसे लोकप्रतिनिधी आता स्वप्नरंजन आहे. आता जमाना आला आहे तो भोंगे वाजवणाऱ्या किंवा चालिसा म्हणणाऱ्या; सुरत-गुहाहाटी-गोवा असा प्रवास करणाऱ्या लोकप्रतिनिधींचा.

एक आठवण बी.टी.देशमुख विधान परिषदेची निवडणूक हरले, तेव्हाची आहे. तेव्हा मी 'लोकसत्ता'च्या विदर्भ आवृत्तीचा संपादक होतो. निकाल आल्यावर आमचे तत्कालीन संपादक कुमार केतकरांना फोन केला. निकाल सांगतांना माझ्या स्वरातली निराशा आणि दु:ख बहुधा तीव्र शब्दांत व्यक्त झालं आणि ते केतकरांनी ओळखलं. 'बी.टी. हरले' हे ऐकल्यावर त्यांनाही वाईट वाटलं. मग केतकर म्हणाले, 'बी.टी. हरायला नको होते, पण घडलं ते घडलं. उद्याच्या 'व्यक्तीवेध'मध्ये निवडणूक हरलेल्या बी.टीं.वर तू लिही.' त्याप्रमाणं दुसऱ्या दिवशी 'लोकसत्ता'त बी.टीं. वर 'व्यक्तीवेध' प्रकाशित झाला. **निवडणूक हरलेल्या पण, चारित्र्यवान आणि तळमळीच्या असलेल्या नेत्याची दखल घेतली जाण्याचा पत्रकारितेच्या माझ्या साडेचार दशकातला तो एक भरजरी ऐवज आहे.**

बी.टी. यांच्यासारखे लोकप्रतिनिधी आता अपवादानंच उरले आहेत आणि अनुभव कथन केला तशी पत्रकारिता आता लोप पावते आहे. संपादक ही संस्था संपुष्टात आली आहे. बहुसंख्य संपादक आणि पत्रकार व्यवस्थापनासमोर तर व्यवस्थापन जाहिरातदारासमोर लोटांगण घालत असल्याचं चित्र आहे. अग्रलेख मागे घेणारे संपादकही आहेत. हे एकूणच चित्र मन विषण्ण करणारं आहे...

*****   *****   *****

*( COMMENTS )*

**Pradyumna Pathak :** फक्त सुरत - गुवाहाटी - गोवा मार्गे जाणाऱ्या आमदारांना बोलून पक्षपातीपणा का करताय..? निवडणूकपूर्व युती केवळ खुर्चीसाठी मोडणाऱ्या बांद्र्याच्या दगाबाज बापलेकांबद्दल आपल्याला अतीव आदरच असेल नाही.... !!

**Praveen Bardapurkar :** पक्षपातीपणा नव्हे ते अधःपतनाचं प्रतीक आहे हे समजून घ्या.

**मिलिंद वडमारे :** शब्दशः अर्थ घेणे हाच हल्ली ट्रेंड झालाय.

**Ramesh Kulkarni :** not applicable for congress ? Only for bjp/ Shinde group.

**Ratnakar Mahajan :** मुंबईत धावत-पळत बेस्टची बस गाठणारे बी टी मी पाहिले आहेत. गोरेगाव ते चर्चगेट लोकलने प्रवास करून पुढे विधान भवन/पक्ष कार्यालयात चालत येणाऱ्या मृणाल गोरेही पाहिल्या आहेत.

**Praveen Bardapurkar :** मृणालताई मलाही आठवतात. त्यांच्यासोबत एक लोकल प्रवासही केलाय मी. खरं तर, असे वागणारे तेव्हा बहुसंख्य होते, किती तरी नावं घेता येतील.

**Sureshkumar Vairalkar :** कॉम्रेड अहिल्या रांगणेकर.

**Ramesh Zawar :** दत्ता ताम्हाणे, अल्का देसाई, एकनाथ गायकवाड ह्यांच्याबरोबर अनेकदा लोकलने व्ही.टी. ला गेलो. कधी कोणीही तोऱ्यात वावरला नाही. बातमी देण्याची गळ तर कुणीच घातली नाही.

**Vilas Dhone :** This is the photograph taken on Wardha railway platform after the General body meeting at Lok Mahavidyalaya, Wardha. The meeting continued till 5 pm and we had to rush back to station without taking food for the whole day. He was a leader in the true sense of the term.

**Praveen Bardapurkar :** thanks for inputs.

**Vilas Dhone :** sir, I am the former Secretary of NUTA.

**Vaishampayan Sheth :** सर, आपला पूर्ण आदर ठेऊन लिहितोय कधी तरी ज्यांच्या बरोबर युती करू निवडुन आलेल्या उद्धव ठाकरे यांच्या बद्दल व्यक्त व्हा, नाहीतर आपले लिखाण एकांगी आहे असे वाटेल. फक्त सुरत - गुवाहाटी - गोवा मार्गे जाणाऱ्या आमदारांना बोलून पक्षपातीपणा का करताय..? निवडणूकपूर्व युती केवळ खुर्चीसाठी मोडणाऱ्या बांद्र्याच्या दगाबाज बापलेकांबद्दल आपल्याला अतीव आदरच असेल नाही.... !!

***छत्तीसगढ राजपत्र : (असाधारण) : प्राधिकार से प्रकाशित***

क्रमांक ३२ : रायपुर, शुक्रवार, दिनांक २० जनवरी २०२३: पौष ३०, शक १९४४

## FINANCE DEPARTMENT

**Atal Nagar, the 20th January 2023**

**NOTIFICATION**

Sl. No. F 2016-04-03289/Finance/Rules/Four. & In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India, the Governor of Chhattisgarh, hereby, makes the following further amendment in the Chhattisgarh Civil Services (Pension) Rules, 1976, namely :-

**AMENDMENT**

In the said rules,-

1. In sub-rule (1) of rule 2 of Chapter-1, for the symbol and figure "(1)", the symbol and figure "(1)(a)" shall be substituted.

2. After sub-rule (1)(a) of rule 2 of Chapter-1, the following sub-rule shall be inserted, namely :-

"(1)(b) Government employees who have been appointed between 01-11-2004 to 31-03-2022 and who opt for the old pension scheme, will get the benefit of the old pension scheme only when they shall be deposited the Government contribution deposited in their NPS account and the dividend earned thereon till the date of withdrawal, in the Government Fund."

3. After clause (f) of sub-rule (2) of rule 2 of Chapter-1, the following clause shall be added, namely:-

"(g) These rules shall not be applicable to those Government servants who have been appointed from 01-11-2004 to 31-03-2022 and have opted to continue in the New Contributory Pension Scheme (NPS) in view of the Finance Department's Notification No. F 2016-04-03289/Finance/Rules/Four, dated 20-01-2023"

By order and in the name of the Governor of Chhattisgarh,

ATISH PANDEY, Joint Secretary

**Praveen Bardapurkar :** अहो, तुम्ही माझे नियमित वाचक आहात. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यावर किंवा तत्पूर्वी लॉंग रन हॉर्स आणि सुसंस्कृत नेता हा त्यांचा सतत केलेला उल्लेख विसरलात का? तो सगळा मजकूर अजूनही ब्लॉगवर उपलब्ध आहे. युती तोडल्यावर आणि मुख्यमंत्रीपद गेल्यावर स्पष्टपणे मी व्यक्त केलेली मते कृपया काढा आणि वाचा.

**Mugdha Dhananjay :** त्यांच्या बद्दल कडवट लिहावे अशी ती फर्माईश आहे, मला वाटतं!

**Praveen Bardapurkar :** अगं खरं तर दोन्ही अँगलमधून याआधीच लिहिलं आहे तरी...

**Mugdha Dhananjay :** सोडून द्यायचं.

**Ramesh Kulkarni :** well said sir.

**Vinod Deshmukh :** बीटी अनोखेच... गेले ते दिन गेले.

**Prashant Pawar :** डावी विचारसरणी मला आवडत नसली तरी त्यांचा साधेपणा भावतो.. मी २००८ साली मुंबईत शिकत असताना अहिल्याताई रांगणेकर यांचा मृत्यू झाला होता त्यावेळी वृंदा करात, डी राजा अशी वरिष्ठ कम्युनिस्ट मंडळी आली होती त्यावेळी त्यांना वरळीतील अतिशय सामान्य उपाहारगृहात कोणत्याही बडेजावाशिवाय जेवताना पाहिले आहे..

**Panjabrao Deshmukh :** बी.टी.देशमुख, कॉम्रेड सुदाम देशमुख, भाई गणपतराव देशमुख, एन.डी.पाटील, भाई केशवराव धोंडगे आदी जिवंतपणीच आख्यायिका बनलेले असामान्य व्यक्तीमत्व आता होणे नाही..

**Rahul Humane :** बी.टी. नंतर सुदामकाका ......

**Anil Hood :** भाऊ आमचे आदर्श आहेत. भाउ समवेत राहण्याचे व कार्य करण्याचे भाग्य आम्हाला लाभले. कांही करंट्यानी भाऊंना पराभूत करण्यात धन्यता मानली हा केवढा कृतघ्नपणा ! भाउंची आजही नितांत गरज आहे. असे निर्मोही नेते आज दुर्मिळ झाले आहेत. भाउच आमचे नेते होते, आहेत व राहतील.

**Milind Deshkar :** आदरणीय बी.टी सरांसारखे आमदार आता भिंग घेऊन शोधले तरी एकही सापडणार नाही.

**Arun Khedekar :** बी.टी. सरांनी खरच या विदर्भातील अनेक तरुणांना अभ्यासपूर्ण नेता कसा असतो याचा आदर्श घालून दिला व त्या साठी ते सतत बोलत असत, त्यांचे प्रमाणे स्व.डॉ.श्रीकांत जिचकार व नितीनजी गडकरी हे पण त्याच श्रेणीतील.

**Anant Ghotgalkar :** आमचे कागलचे दौलतराव निकम, कोल्हापूरचे त्र्यं.सी.कारखानीस असेच होते. पहिले तर सत्ताधारी पक्षात असून.

**Sanjay Alkari :** Great Personality.

**Jaikumar Charjan :** बीटी भाऊ ... मुळचे चांदुर बाजार तालुक्यातील बेलोरा गावचे. त्यांचे लहान बंधु जी.टी हे अमरावतीला शिक्षणाधिकारी होते. शिक्षण क्षेत्रात अतिशय आदरयुक्त भीती असलेले ते अधिकारी. बीटी भाऊ म्हणजे माजी आमदार, खासदार राहिलेले कॉ सुदाम काका देशमुख, कॉ.गणपतराव देशमुख या आदर्शवंतापैकीच. सर, आपण वास्तव मांडणी केली नोंदीत.

**Radhakrishna B. Muli :** परवा साहित्य संमेलनाच्या मांडवात एक जण सहज म्हणून गेला ..बी.टीं.च्या पराभवाची ही उशिरा झालेली परतफेड आहे..! (अमरावतीचा निकाल अधिकृतपणे नुकताच जाहीर झाला होता..)

**Dr.Pramod Lende Khairgaokar :** सद्यस्थीतीतील आमदारांचे वागणे बघता.बी.टी.किती ग्रेट होते हे लक्षात येते. आमदारकीतील माणूस.

**Prashant Joshi :** खुप छान सर.

**Sopan Godbole :** याच यादीमधे अजुन नावे टाकाविशी वाटतात. स्व.रामभाऊ म्हाळगी, स्व. हशू अडवाणी, स्व. रामभाऊ कापसे, स्व.सूर्यभान वहाडणे पाटील, स्व. भाऊ गोगटे, परंतु प्रतिक्रिया देणाऱ्या वाचकांना पक्षनिवेशामुळे नावे माहित नसतील.

**Mugdha Dhananjay :** खूपच छान वाटलं हे वाचून. गेलेल्या दिवसांत का होईना, सदसद्विवेक असलेली माणसं क्रियाशील राजकारणात होती... अगदीच निराशा वाटण्याचं कारण नाही.

**विजय तरवडे** : या नोंदींचं छान पुस्तक होईल.

**Mahajan Milind :** सर असेच आमदार शालिग्राम बसैये, रामभाऊ गावंडे हे देखील साधेपणाने जगले.

**Suresh Akotkar :** बी टी, सुदाम काका आणि भाई मंगळे... अमरावतीत आता अशा व्यक्ती दुर्मीळ.

**Alok Jatratkar :** बीटी, गणपतराव देशमुख ही खरी मोठी माणसं अन् जाणिवासमृद्ध सच्चे लोकप्रतिनिधी होते... आता त्यांच्यासारखे नेतृत्व होणे नाही...

**Vasant Wahokar :** लिहित जा असे काही. हृदय स्पर्शी आहे.

**Suresh Mogal Patil :** हो सर आम्ही भाग्यवान आहोत आम्हाला सुद्धा बी टी सरांना जवळून पाहता आले व ऐकता आले.

**Arunkumar Joshi:** साबरमती ते बारामती हा प्रवास आठवतो यामुळेच.

**Milind Patil :** सर, प्रथमदर्शनी मला एकदम शिवाजीराव गिरिधर पाटील



वाटले .. फारच सुंदर व्यक्तिमत्त्व म्हणजे BT सर..

**Suneel Joshi :** खूप प्रेरक...तळमळ आणि समाजभान आयुष्यभर जपणारे व्यक्तिमत्व..

**Prakash Edlabadkar :** तुझं हे टिपण खूप आवडलं प्रवीण....अगदी मनापासून....खरंच गेली ती माणसं अन् गेले ते दिवस...

**Satish Solankurkar :** सर, खूप छान आठवण आहे ही. आपण अशा अनेक व्यक्तिमत्वांना जवळून अनुभवलं आहे हे भाग्य आहे आपलं. आदरणीय बीटी सर निवडणूक हरल्यावरची आपली कातरता.... आता असे होणे नाही. पुढच्या आठवणींसाठी उत्सुक आहे. खूप आभार.

**Anil Sargar :** बी.टी. सारखे अभ्यासु आणि कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी आता दुर्मिळ आहेत.

**Shrikant Kondolikar :** अत्यंत भावस्पर्शी.. व प्रेरणादायी..!

**Hemant Kothikar :** अगदी खरं.... बीटी देशमुख काका माझ्या वडिलांचे प्राध्यापकी काळातले मित्र आणि त्यामुळे बऱ्याचदा घरी जाणे येणे नेहमीच होते. त्यांच्याइतके अभ्यासू प्रतिनिधी फार कमी बघितले. नुटा चे काम असो की विधान परिषदेत प्रश्न विचारणे असो, सर्वांगीण अभ्यास केल्याशिवाय ते काम करीत नसत. बेलोरा ते अमरावती ते विधान परिषद मुंबई हा त्यांचा प्रवास फार सांगण्यासारखा आहे .

**Prabhjeet Singh Bachher :** आदरणीय महोदय मला आज ही आठवते बी टी देशमुख हारले, या टॅग लाईन ने बातमी होती.

**नरेंद्र नरहरी पिठे :** बी टी सराना अभिवादन व मानाचा मुजरा.

**Sachin Sonawane :** सर हे तुम्ही लिहिले नसते तर खरे देखील वाटले नसते. खुप सुंदर लेख.

**Dashrath Shelke :** प्र.ब. आमच्या वसमत तालुक्याचे रं प.देशमुख दोन टर्म आमदार होते. कोणाची बदली किंवा इतर काम ते मोफत करायचे. कोणाकडूनही पैसे मागत नसत. मुंबईला आमदार निवासात कधी गेलो तर ते कॉटवर आम्हाला झोपायला सांगत आणि ते स्वतः खाली झोपत. आमदार निवासात येणाऱ्या पाहुण्यांचे बिलही ते देत असत. त्यांनी राजकारणापायी आपली ८० एकर जमीन विकली. शेवटी त्यांच्या मुलीच्या विवाहात खर्च करण्यासाठी त्यांच्याकडे पैसा नव्हता तेव्हा लोकांनी पैसा जमा करून त्यांच्या मुलीचे लग्न लावून दिले. त्यांच्याच पठडितले कंधारचे आमदार केशवराव धोंडगे, सांगोलाचे आमदार गणपतराव देशमुख. असे त्यागी लोकप्रतिनिधी त्या काळात होते. काळ झपाट्याने बदलला आहे. कालमानानुसार लोकप्रतिनिधींची संस्कृती बदलली आहे. आता आपण म्हणता तसे झटपट श्रीमंत होणारे लोकप्रतिनिधी दिसतात.

**Sanjeevani Shirguppe :** होय! बी टी देशमुख सरांशी आमचे महाविद्यालयीन प्राध्यापकांचे खूप जवळचे संबंध होते. अतिशय साधे, नम्र व तळमळीचे कार्यकर्ते असलेले बीटी हे लाडके नेते होते.

**Bhojraj Dhole :** आदरणीय बीटी सरांच्या सुंदर आठवणी, त्याच्यावर पुन्हा लिहावे. नमस्कार.

**Dinkar Wankhede :**

तुझ्या लेखणीची पुराणी
तुझ्या शब्दांचे आसुड
आणि
निष्टुर नियमांचे लगाम हातात
घेऊन सभागृहात तु एकटा ऊभा असतो
तेंव्हा मोठमोठ्या मुजोर महाभागां पुढे
देखिल शरणागती शिवाय दुसरा ऊपाय
नसतो
भाऊ;
तुझ्या सारखा धुरंधर धुरकरी तुच
अजुन तरी आसपास कुणी दिसत नाही!

**Bharat Nakhate :** Jay Ho.

**Sharad Thakare :** बीटी सरांचा नितांतआदर करतो आम्ही .... पण तुम्ही गुवाहाटी चा उल्लेख मुद्दाम करुन ....मुख्य वरळीचे बापलेकं दोषी सोडून देता.

**Khanderao Binnor :** पुर्वीच्या नेते मंडळीला आताच्या नेते मंडळी इतका पैसा मिळत नव्हता भते, पगार, निवृत्तीवेतन अशा प्रकारची खैरात स्वतः विधिमंडळात मंजूर करून घेतलेली नव्हती तेव्हाचे नेते स्वतःला जनतेचे सेवक समजत होते आता नवीन इंग्रज तयार झाले आहेत.

**Subhash Gadiya :** बी टी यांचा पराभव करून विदर्भाने खूप गमावले आहे.

*****

*गुरुवार, दिनांक २ डिसेंबर २०१० रोजीच्या दैनिक 'लोकसत्ता' मध्ये 'व्यक्तिवेध' या सदराखाली प्रसिद्ध झालेला मजकूर.*

# व्यक्तिवेध

विधान परिषदेच्या अमरावती पदवीधर मतदारसंघाच्या झालेल्या निवडणुकीत प्रा.बी.टी.देशमुख यांचा पराभव झाल्याने, प्रदिर्घ काळ सुरु असलेल्या शैक्षणिक चळवळीचा आणि विदर्भाच्या अनुशेषाच्या संसदीय संघर्षाचाही पराभव झाला आहे. भाऊराव तुळशीरामजी उपाख्य बी.टी.देशमुख नावाची चळवळ १९६० साली अमरावतीच्या शैक्षणिक क्षेत्रात सुरू झाली आणि पाहता पाहता या चळवळीने राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रात संचार सुरू केला. विद्यार्थी असतानाच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बी.टी.सहभागी झाले. बी.टी.च्या घरी अठराविश्वे दारिद्र्य होते. पण, तरूण वयापासूनच परिस्थितीला शरण न जाता संघर्षरत राहण्याची बी.टीं.ची वृत्ती होती. शिक्षण आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, **अशा दोन्ही आघाड्यांवर सक्रिय राहण्यासाठी पोट किमान भरलेले असावे, ही मूलभूत गरज होती आणि ती भागवण्यासाठी भाऊराव नावाचा हा युवक चक्क कंपोझिटरचे म्हणजे छापखान्यात अक्षरे जुळवण्याचे काम करत असे.** कंपोझिटरची ही नोकरी करत करतच राज्यशास्त्र या विषयात एम.ए.ची पदवी संपादन केली आणि राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून शिक्षण क्षेत्रात पाऊल टाकले. तो काळ शिक्षकी पेशासाठी कमी वेतन आणि प्रामाणिकपणे विद्यादानाचा होता. विद्यादान करणाऱ्यांना चरितार्थासाठी येणाऱ्या अडचणी स्वतः अनुभवतांना बी.टी. मधला चळवळ्या जागा झाला त्यातूनच महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्यासाठी विदर्भभर आंदोलने उभारण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. **नेतृत्वासाठी नैतिक पातळीवर असणारे स्वच्छ चारित्र्य त्यांच्याजवळ होतेच. त्यामुळे शिक्षक चळवळीचे नेतृत्व त्यांच्याकडे आपसूकपणे चालत आले. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचे (नुटा) १९७३ पासून आजपर्यंत ते अध्यक्ष आहेत. सलग एखाद्या चळवळीचे ३८ वर्षे अध्यक्षपद भूषवले जाण्याचा हा विक्रमच असावा! 'नुटा'चे अध्यक्ष पद सांभाळत असतांनाच महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्षपदही त्यांच्याकडे अपरिहार्यपणे आले.**

चळवळी उभारतानाही विद्यादानाच्या व्रतापासून बी.टी. क्षणभरही ढळले नाहीत. प्राध्यापकपदाच्या नोकरीतून अधिकृतरित्या निवृत्त होईपर्यंत म्हणजे ३०-३२ वर्षे बी.टी. नियमितपणे शिकवत असत. केवळ रस्त्यावर संघर्ष करुन शिक्षकांचे प्रश्न सोडवता येणार नाही. म्हणून १९८० साली बी.टीं.नी विदर्भ पदवीधर मतदारसंघातून महाराष्ट्र विधान परिषदेत प्रवेश केला. अमरावती विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी बी.टीं.नी विधिमंडळात सर्व संसदीय अस्त्रांचा वापर केला. हे विद्यापीठ स्थापन झाल्यावर म्हणजे १९८६ मध्ये हा मतदारसंघ अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघ म्हणून ओळखला जाऊ लागला. **या मतदारसंघातून सलग पाच वेळा बी.टी.विधान परिषदेवर विजयी झाले. ३० वर्षाच्या संसदीय जीवनात त्यांची प्रतिमा अभ्यासू आमदार म्हणून राहिली. शिष्टाचाराचा, वर्तनाचा कोणताही तोल ढळू न देणारा आणि तरी अत्यंत आक्रमक आमदार म्हणून बी.टी.देशमुख यांची कारकीर्द तेजस्वी राहिली, तशीच ती निष्कलंकही राहिली. याच संयत आक्रमकतेच्या जोरावर शिक्षकांचे अनेक प्रश्न सोडवण्यात बी.टी.ना यश आले. एखाद्या विषयावर बी.टी. बोलायला लागले तर संपूर्ण सभागृहात पूर्ण शांतता असे.** दहा बारा वर्षात बी.टी. आणि नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने सभागृहात विदर्भाच्या अनुशेषाच्या निवारणासाठी जो 'संसदीय संघर्ष' उभारला गेला, त्याची नोंद सुवर्णाक्षरांनी होईल. विदर्भ विकासाच्या निधीवर डल्ला मारणाऱ्यांना देशमुख गडकरी या दुकलीने अक्षरशः सळो की पळो करून सोडले. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यावर गडकरी दिल्लीला गेले आणि विकासाच्या संसदीय लढाईची जबाबदारी एकट्या बी.टी.वर आली. एकाच वेळी संसदीय आणि उच्च न्यायालय अशा दोन पातळ्यांवर एकहाती ही लढाई बी.टी.लढत होते. बी.टी.च्या पराभवामुळे विधान परिषदेतील या लढाईचे नेतृत्वच संपले आहे. असे नव्हे तर या लढाईची धार अतिशय बोथट झाली आहे. विधान परिषद निवडणूकीतील बी.टी. देशमुख यांच्या पराभवाचा अर्थ इतका असा व्यापक आहे आणि विदर्भाचे केवढे मोठे नुकसान झालेले आहे हे स्पष्ट करणारा आहे. बी.टी.देशमुख तन आणि मनाने चळवळे आहेत. वयाच्या सत्तरीतही चैतन्याने फुललेलेच आहेत. ते हार मानणार नाहीत. आता पुन्हा रस्त्यावरचा संघर्ष सुरू करतील. त्यांच्या पुढच्या लढाईला शुभेच्छा!

# Punjab: High Court restores primacy of higher education regulators

The teachers of Chandigarh have been facing the worst of all scenarios. First, they have to wait for the Centre to notify UGC/AICTE rules and regulations, then for the Punjab Government to either endorse or amend the central notifications.

**(Written by Avanindra Chopra)**

Though the government finally plans to have a single regulator in the Higher Education Council of India (HECI), as of now there are two premier higher education regulators in India. While the UGC is the regulator for universities, AICTE acts as a regulator for engineering, pharmacy, management and other technical education colleges. There are other regulators for professional courses in agriculture, law, architecture, teacher education, etc. **These promote, coordinate, determine and maintain norms and standards of teaching, examination and research all over the country.**

It would have been certainly better if the designated regulator's writ were to run supreme over matters under their jurisdiction, what with higher education being in the Concurrent list, and the national regulators being established by their respective acts of Parliament. But with state governments and many universities refusing to go by the 'regulations/rules/guidelines' set out by national regulators, multiple disparities have arisen over time. **The teaching community feels measures favouring teachers become classified as 'recommendatory' while those imposing strict conditions on them become 'mandatory'. This injustice leads to prolonged litigations and acrimonious protests agitations.**

The teachers of Chandigarh have been facing the worst of all scenarios. First, they have to wait for the Centre to notify UGC/AICTE rules and regulations, then for the Punjab Government to either endorse or amend the central notifications, many a time to the detriment of teachers, and then for the Chandigarh Administration to follow what Punjab notifies. This arrangement was as per a reading of 'The Conditions of Service of Union Territory of Chandigarh Employees Rules, 1992', notified on 13.01.1992 ('1992 Rules'), under Article 309 of the Constitution. These state that the rules framed by the Punjab Government are ipso facto applicable to the corresponding posts of Chandigarh Administration. And, this protracted exercise would take years together. **But this reading has been found to be erroneous by the Hon'ble High Court of Punjab and Haryana.**

**Chandigarh teachers are feeling relieved after the much awaited judgement was uploaded on May 21, 2021. The court has accepted the plea of the petitioner teachers working in Government College of Arts and Government College of Architecture, Chandigarh, enhancing their age of retirement to 65 years with a further provision of extension up to 70 years as per the relevant AICTE/UGC/ Council of Architecture regulations and not 58 years as per rules framed under '1992 Rules'. The court has directed the UT administration to take back the petitioners who have been forcibly superannuated and grant them all consequential benefits.**

The Court has ruled that '1992 Rules' do not apply to them. Moreover, with higher education being on the Concurrent List, **the court has observed that the regulations issued under the Central Act will be operative qua the colleges/institutions which fall within the said regulations.** In the process the court set aside the CAT order upholding the '1992 Rules'.

The court also dismissed the UT stand that these provisions of the central acts are only applicable to Central Educational Institutes/Centrally Funded Institutions/Central Universities and not to the institutions under its ambit. The court has ruled that the funds for these institutions are provided by the Central Government and UT merely distributes them for running these colleges. In any case, the court said that this is not a requirement per se for the applicability of the central acts. **This would suggest that rules followed by the Chandigarh Administration that are in conflict with central laws in the field of higher education are unlawful.**

This ruling is bound to have far-reaching implications for other sections of affected employees as well.

Teachers have long felt that their 'rightful and legitimate demands' are often ignored by the Chandigarh Administration because of its erroneous interpretation of rules.

Significantly, this judgement will enable the teachers of Chandigarh, to become part of the national mainstream of higher education. Fortunately, it comes amid fears that the Punjab government may for the first time delink the pay-scales of teachers from the 7th CPC-UGC minimum grades. Now, the teachers can hope that UT will not only implement the much awaited 7th CPC-UGC pay scales, but the UGC scheme in toto without any delay.

*- The Indian Express, Monday, 24th May 2021*

**This would suggest that rules followed by the Chandigarh Administration that are in conflict with central laws in the field of higher education are unlawful.**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/078/2021-23 (Uploaded on www.nuta.in on 07.03.2023) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.03.2023**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,......................................................................

......................................................................

......................................................................

......................................................................